सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.४ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## उत्तराखंडच्या अल्मोडामध्ये ४० प्रवाशांनी भरलेली बस दरीत कोसळली; २० जणांचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अल्मोडा**

उत्तराखंडमधील अल्मोडा येथे प्रवाशांनी भरलेल्या बसचा भीषण अपघात झाला आहे. मार्चुला परिसरात प्रवाशांनी भरलेली बस दरीत पडल्याची माहिती मिळत आहे. बसमध्ये ४० हून अधिक लोक प्रवास करत होते. घटनेनंतर एसएसपी अल्मोडा घटनास्थळी पोहोचले. बचावकार्यासाठी एसडीआरएफची तीन पथकं अपघातस्थळी पोहोचली असून बचावकार्य सुरू आहे. अल्मोडा एसपींनी अपघातात २० जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे.

एसडीएम संजय कुमार यांनी सांगितलं की, काही लोक जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात येत आहे. अल्मोडा पोलीस ठाण्याच्या सॉल्ट मर्चुला परिसरात हा अपघात झाला. बस खोल दरीत कोसळून अनेक जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे.


एसडीएम संजय कुमार यांनी सांगितलं की, काही लोक जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात येत आहे. अल्मोडा पोलीस ठाण्याच्या सॉल्ट मर्चुला परिसरात हा अपघात झाला. बस खोल दरीत कोसळून अनेक जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे.

आलोक कुमार पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस गढवालहून कुमाऊंकडे जात असताना अल्मोडा येथील मर्कुलामध्ये हा अपघात झाला. बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते, त्यामुळे मृतांचा आकडा वाढू शकतो. शोध आणि बचाव कार्य सुरू करण्यासाठी पोलीस आणि एसडीआरएफचे जवान घटनास्थळी पोहोचले आहेत.

अल्मोडा एसपी देवेंद्र पिंचा यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात आतापर्यंत २० प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. बचावकार्य सुरू आहे, प्रशासन लोकांना वाचवण्यात व्यस्त आहे. या दुर्घटनेबद्दल राज्याचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी शोक व्यक्त केला आहे. सोशल मीडिया पोस्ट केली आहे.

## राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्लांची तातडीनं बदली; निवडणूक आयोगाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**



विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तातडीने बदली करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. रश्मी शुक्ला यांच्याविरोधात काँग्रेससह विरोधकांनी आयोगाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर आज यावर निर्णय घेत निवडणूक आयोगाने शुक्ला यांची बदली करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे उद्यापर्यंत पाठवा अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव यांना आयोगाने दिले आहेत.

रश्मी शुक्ला यांची कारकिर्द वादात होती. फोन टॅपिंगमुळे विरोधकांनी रश्मी शुक्ला यांच्यावर आरोप केले होते. मुदत संपूनही रश्मी शुक्ला यांना २ वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती. रश्मी शुक्ला यांना पदावरून हटवावं अशी मागणी सातत्याने विरोधकांकडून केली जात होती. याबाबत विरोधकांनी केंद्रीय निवडणूक अधिकाऱ्यांचीही भेट घेतली होती. रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळात निष्पक्षपणे निवडणूक पार पडणार नाहीत असा आरोप विरोधकांनी केला होता. त्यानंतर आज निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला आहे.

## ठाकरेंनी सदा सरवणकरांना घरातही घेतलं नाही, मुलाकडून संदेश पाठवला, तुम्हाला लढायचं तर लढा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

विधानसभा निवडणुकीचा अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी माहीम विधानसभा मतदारसंघात सोमवारी रंजक राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना सदा सरवणकर हे मनसेप्रमुख राज ठाकरे यांना भेटण्यासाठी शिवतीर्थ या निवासस्थानी गेले होते. मात्र, त्याठिकाणी पोहोचल्यानंतर सदा सरवणकर राज ठाकरे यांच्या घरात गेले नाहीत. सदा सरवणकर यांचा मुलगा समाधान सरवणकर आणि काही पदाधिकारी शिवतीर्थ निवासस्थानी आतमध्ये गेले. त्यांनी राज ठाकरे यांच्याकडे जाऊन सदा सरवणकर यांना आपल्याला भेटायचे असल्याचे सांगितले. मात्र, राज ठाकरे यांनी सदा सरवणकर यांना भेटण्यास नकार दिला.



यानंतर सदा सरवणकर यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, राजसाहेबांना भेटायला माझा मुलगा आणि काही पदाधिकारी गेले होते. त्यांनी सांगितले की, पप्पा बाजूला आहेत, तुम्हाला भेटू इच्छितात, निवडणुकीबाबत बोलू इच्छितात. पण राज ठाकरे म्हणाले, मला काही बोलायचं नाही. तुम्हाला निवडणूक लढवायची तर लढवा, उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा तर मागे घ्या. मला यावर कोणतीही चर्चा करायची नाही, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

त्यामुळे राज ठाकरे आणि माझ्यात कुठलंही बोलणं झालं नाही. राज ठाकरे यांनी भेटसुद्धा नाकारली. त्यामुळे आता एक कार्यकर्ता म्हणून मला माहीममधून निवडणूक लढवावी लागेल. भेटच मिळणार नसेल तर मला माझा निर्णय घ्यावा लागेल. मी महायुतीचा उमेदवार म्हणून रिंगणात आहे. वैयक्तिक मैत्रीपोटी भाजपचे काही नेते अमित ठाकरे यांना पाठिंबा देत असतील. पण महायुतीचे कार्यकर्ते माझ्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास सदा सरवणकर यांनी व्यक्त केला.

## मनोज जरांगेंची निवडणुकीतून माघार; म्हणाले,उमेदवारी नाही, कोणालाही पाडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४जालना**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल(दि.३) कोण-कोणत्या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवणार, याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली होती. तसेच, कोणत्या जागेवरील उमेदवार पाडण्याचे याबाबतही सांगितले होते. मात्र, आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठा निर्णय घेत विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे.

मित्रपक्षाची यादी आलेली नाही. त्यामुळे एका जातीवर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. त्यामुळे समाज बांधवांनी आपापले अर्ज काढून घ्यावेत. उमेदवार द्यायचा नाही, आता कोणाला पाडायचे ते पाडा आणि कोणाला आणायचे ते आणा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी (दि.४) केले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी दिवसभरात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांची बैठक घेतली.



मराठा, मुस्लिम आणि दलित अशी त्रिसूत्री घेत या बैठकीत २५ मतदार संघावर चर्चा करण्यात आली. रात्री १४ मतदार संघ ठरवून मराठा समाजाचे उमेदवार अंतिम करायचे होते. इतर ठिकाणी मुस्लिम, दलित मित्रपक्षातील उमेदवार देण्यावर चर्चा करण्यात आली. सोमवारी पहाटे ५ वाजेपर्यंत कोणत्या जागांवर निवडणूक लढवायची, एका जातीवर निवडणूक लढायची का यावर चर्चा करण्यात आली. परंतु, मित्रपक्षाची यादी सकाळी ९ वाजले तरी आलेली नाही.

यादी आली नसली तरी ते मित्रपक्ष आपलेच आहेत. त्यामुळे जरांगे पाटील यांनी समाजाच्या जिवावर निवडणूक लढविता येत नाही. महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो कोणी आमच्या कामाचे नाही. त्यामुळे कोणाला पाडा आणि कोणाला आणा म्हणण्यात अर्थ नाही. तुमच्या मतदार संघात तुम्हाला ज्याला मदत करायची त्याच्याकडून 'मी तुमच्या मागण्यांशी सहमत आहे', असे लिहून घ्या, असे आवाहन केले. आम्ही निवडणुकीत असलो तरी समोरच्याचा खेळ खलास आणि नसलो तरी खेळ खलास, असे म्हणत विरोधकांना जरांगे पाटील यांनी इशारा दिला. तसेच आता गणिमी काव्याने समाजाची ताकद दाखवू, असेही ते म्हणाले.

## माझी लाडकी बहीण ही फक्त योजना नसून,भावाकडून बहिणीला दिलेली प्रेमाची ओवाळणी - अमृता फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई**

महाराष्ट्रात निवडणुकीचं घोडामैदान जवळ आलं आहे. या निवडणुकीच्या आधी चर्चेत आलेली योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. या योजनेच्या अंतर्गत ज्या महिला पात्र आहेत त्यांना दरमहा १५०० रुपये मिळत आहेत. २ कोटींहून अधिक महिलांना या योजनेचे पैसे मिळाले आहेत. ऑक्टोबर महिन्यांत आचारसंहिता लागणार असल्याने या महिन्याचे आणि नोव्हेंबर महिन्याचे पैसेही लाडक्या बहिणींच्या खात्यांवर जमा करण्यात आले आहेत. दरम्यान याच लाडकी बहीण योजनेवर अमृता फडणवीस यांनी केलेली पोस्ट चर्चेत आली.

**काय आहे लाडकी बहीण योजना?**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेंतर्गत २१ ते ६५ वर्षे वयोगटातील पात्र महिलांना दरमहिना १५०० रुपये देण्यात येणार आहेत.



सुमारे एक कोटी महिलांना याचा लाभ होणार असून जुलैपासून या योजनेची अंमलबजाणी केली जाणार आहे. त्यासाठी सरकारवर वर्षाला ४६ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे. १ जुलैपासून या योजनेसाठी अर्ज सुरू झाले होते.'माझी लाडकी बहीण' ही केवळ योजना नसून आपल्या सर्व बहिणींच्या आर्थिक सन्मानाला जपणारी भावाकडून बहिणीला दिलेली प्रेमाची ओवाळणी आहे. राखी पौर्णिमेला मी महिला मेळाव्यात,शिक्षक सहकारी बँक सभागृहात यासंदर्भात आपल्याला आवाहन केलं होतं, भावाला कायम साथ देण्याचं आणि आता भाऊबीजेला देखील तेच सांगते की सर्व लाडक्या बहिणींच्या प्रेमाचा ठेवा मायेची थाप देवेंद्रजींच्या पाठीवर असू द्या.मला खात्री आहे की आपण बहिणी भावाच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभ्या राहू ! अशी पोस्ट अमृता फडणवीस यांनी केली आहे.

## मोर्शीतून भाजपचे बंडखोर उमेदवारांची माघार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ४ मोर्शी**

मेळघाटमधील भाजपचे बंडखोर उमेदवार माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांच्यासह ९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. मात्र भाजपच्या अन्य बंडखोर उमेदवार ज्योती सोळंके यांनी माघार न घेतल्याने भाजपसमोरील अडचणी कायम आहेत. काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मन्ना दारसिंबे यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महाविकास आघाडीला दिलासा मिळाला आहे. मोर्शीतून भाजपचे बंडखोर उमेदवार डॉ. मनोहर आंडे, राजेंद्र आंडे, श्रीधर सोलव, अमित कुबडे यांनी माघार घेतली आहे, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) बंडखोर विक्रम ठाकरे रिंगणात आहेत. जिल्ह्यात एकूण २४८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते, त्यापैकी ८८ जणांनी माघार घेतल्याने १६० उमेदवार लढतीत कायम आहेत.

## अमरावती मतदार संघात होणार चौरंगी लढत तर बडनेऱ्यात पंचरंगी लढत

### गुप्ता यांना माचीस,भारतीय यांना प्रेशर कुकर, कदम यांना ट्रम्पेट तर प्रीती बंड यांना ऑटो रिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

विधानसभा निवडणुकीचं रणशिंग फुंकलं आहे. आज ४ नोव्हेंबरला उमेदवारांनी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता गेल्या अनेक दिवसांपासून महायुती आणि महाविकास आघाडीकडून अमरावती आणि बडनेरा मतदार संघात अपक्ष अर्ज दाखल केलेल्या नाराज उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी मनधरणी केली जात होती मात्र महाविकास आघाडी आणि महायुतीच्या वरिष्ठ नेत्याना फारसे काही यश मिळाले नाही त्यामुळे आता बडनेरा मतदार संघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पस्ट झाले आहे. तर अमरावती मतदार









संघात हि चौरंगी लढतीचे चित्र स्पस्ट झाले.

बडनेरा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार म्हणून रवी राणांना पाठिंबा मिळाला आहे ते आपल्या युवा स्वाभिमान या पक्षाच्या पाना या तिकिटावर निवडणुकीच्या रिंगणात आहे तर महाविकास आघाडीचे उमेदवार उबाठा गटाचे सुनील खराटे हे मशाल घेऊन रिंगणात आहेत मात्र या दोन्ही उमेदवारांची डोकेदुखी एक अपक्ष उमेदवार तुषार भारतीय व दुसरे शिवसेनेच्या उमेदवार प्रीती बंड यांनी चांगलीच वाढविली आहे आज शेवटच्या दिवशी दोघानेही आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही त्यामुळे बडनेरा विधानसभा मतदार संघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पस्ट झाले आहे.तर नितीन कदम हे सुद्धा आपले भाग्य बडनेरा मतदार संघातून आजमावत आहे अमरावती शहरात भाजपाचे माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने अमरावती मध्ये मनसे ,महायुती, महाविकास आघाडी व अपक्ष जगदीश गुप्ता हे निवडणुकीच्या मैदानात आहेत त्यामुळे अमरावती व बडनेरा मतदार संघात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र स्पस्ट झाले आहे . प्रीती बंड यांना ऑटो रिक्षा हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे तर तुषार भारतीय यांना प्रेशर कुकर हे चिन्ह मिळाले आहे तर नितीन कदम यांना ट्रम्पेट हे चिन्ह मिळाले आहे तर जगदीश गुप्ता यांना माचीच हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे.

## संपादकीय ......

# निवडणुकीत सर्वसामान्य कुठे?

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून राजकीय पक्ष आणि नेत्यांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. आजवर सुरू असलेल्या जागावाटपांच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असला तरी आरोप-प्रत्यारोपांची राळ, बंडखोरी, बंडखोरांची मनधरणी, त्यांना दिली जाणारी प्रलोभने अशा घटना-घडामोडींनी राजकीय पटल व्यापले आहे. सत्ताधारी आणि विरोधकांच्या या 'मेगा इव्हेंट'समोर जनतेचे मूलभूत प्रश्न गौण ठरत आहेत याची खंत वाटते. राजकीय पक्षांमधील भरती आणि ओहोटी हे असे दोनच प्रश्न राज्याच्या केंद्रस्थानी असल्याचे चित्र रंगवले जात आहे. एकीकडे फेक नॅरेटिव्हचे दाखले देत सत्ताधारी विरोधकांवर तुटून पडत आहेत, तर दुसरीकडे आपलीच लाट असल्याचे दावे करीत विरोधक सत्ताधार्यांना पाण्यात बघत आहेत, हे सातत्याने सांगितले जात आहे. असे असताना मराठा-वंजारी, हिंदुत्ववादी-धर्मनिरपेक्ष, संविधानाचे समर्थक-विरोधक अशा विषयांवर जाणीवपूर्वक सामाजिक तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. सर्वसामान्यांना त्यांच्या मूळ प्रश्नांची आठवणच राहू नये म्हणून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारने अशा काही योजना आणल्या आहेत, ज्यामुळे गरीब आणि कनिष्ठ मध्यमवर्ग हुरळून जाईल. थोडक्यात या घटकांच्या खिशात शासकीय योजनांच्या नावाने तुटपुंजे पैसे कोंबून त्यांची मते वळवण्यासाठीचे प्रयत्न 'अधिकृतपणे' सुरू आहेत. या सगळ्यांमध्ये सामान्यांच्या जगण्याचे प्रश्न खड्ड्यासारखे अलगद बाजूला होत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या या आसमंतात सामान्यांचे डोळे दिपवून त्यांना व्यवहारातील जगण्या-मरण्याचे प्रश्न दिसूच नयेत, जर दिसलेच तर समजू नयेत, जर समजले तर त्याचे आकलन होऊ नये आणि चुकून आकलन झालेच तर त्याचे परिणाम ध्यानात येऊच नयेत यासाठीचे हे प्रयत्न आहेत.

ऐनवेळी धर्म, जातीय अस्मिता टोकदार करण्यामागे निवडणुकीचे गणित आहे. कोणत्याही दोन समाजांमध्ये नेहमीच वादाच्या ठिणग्या यापूर्वीही पडत होत्या, मात्र निवडणुकीआधी त्याचे राजकीय भांडवल करण्यासाठी नेते कंबर कसून वाटच बघताना दिसतात. त्यांच्या भाषणांतून हे स्पष्ट होत आहे. विरोधकांनाही सत्तेच्या इच्छेपुढे सामान्यांचे प्रश्न दिसेनासे झाल्याचे चित्र आहे. उमेदवार्या जाहीर झाल्यानंतर होणार्या बंडखोर्या आणि माघारी नाट्यामुळे विरोधक काय किंवा सत्ताधारी काय दोघांनाही सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांची स्पेस कव्हर करण्याचीच चिंता असल्याचे समोर आले आहे. निवडणूक आणि त्यांचे निकाल लागेपर्यंत लोकांच्या गरजांपेक्षा कट्टरवादी आणि भावनिक राजकारणाच्या नशेत मतदारांना गुंग करून ठेवण्यात येते. या नशेमुळे बधिर झालेला मेंदू मतदानाच्या दिवशी भ्रमिष्ट करून आपल्या बाजूने वळवण्याचे प्रयत्न राजकारण्यांकडून सुरू झाले आहेत. हे इतके नियोजनबद्धपणे केले जात आहे की त्याविषयी स्वत: मतदारांनाही शंका येऊ नये. यातील घटनांची साखळी पाहता यामागे फार सुयोग्य पद्धतीने केलेले प्लानिंग असल्याची शंका यावी, मात्र यात शेतकरी, कामगार, समान्य जनतेचे प्रश्न नेहमीसारखेच यंदाही दुय्यम ठरवले जाणार आहेत. काही महिन्यांपूर्वीपर्यंतच्या कांदा निर्यातबंदीमुळे महाराष्ट्रातल्या कांदा उत्पादकांना मोठा फटका बसला आहे. अतिवृष्टीचा मार बसलेला शेतकरी आणखीनच अडचणीत सापडला आहे. कर्जबाजारीपणा, पाणीटंचाई आणि अनियमित बाजारभाव यामुळेही शेतकरी मेटाकुटीस आला आहे. राज्यात विशेषत: विदर्भ आणि मराठवाडा भागात अनेक वर्षांपासून दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. सततचा कर्जाचा भार आणि कमी उत्पादन यामुळे शेतकर्यांचे आर्थिक संकट वाढले आहे. राज्यातील शेतमालाला हमीभाव देण्याच्या घोषणा केवळ राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यापुरत्याच मर्यादित राहतात. बियाणे आणि खतांच्या वाढत्या किमतींमुळे शेतकर्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे कष्टकर्यांनाही रोजगार मिळणे हे एक मोठे आव्हान बनले आहे.

कोरोनाच्या काळात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आणि आजही या समस्येचे निराकरण झाल्याचे दिसत नाही. मुंबई, पुणे आणि नागपूर यांसारख्या शहरी भागात कामाच्या संधी असूनही ग्रामीण भागातील लोकांना प्रवास करून शहरात यावे लागते. त्यामुळे त्यांचा राहण्याचा आणि प्रवासाचा खर्च वाढतो तसेच वाढत्या महागाईमुळे जीवनमान महाग झाले आहे, ज्यामुळे दैनंदिन जीवनात ताण निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील कामगारांमध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांचा मोठा हिस्सा आहे. बांधकाम, शेती आणि इतर क्षेत्रातील असंघटित कामगारांना नियमित रोजगार आणि सामाजिक सुरक्षा नाही. अनेक राजकीय पक्षांनी रोजगार हमी योजना तसेच कामगारांसाठी किमान वेतन आणि त्यांना आरोग्य सुविधा देण्याचे आश्वासन दिले आहे, मात्र हे आश्वासन प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. वाढती महागाई, सार्वजनिक सेवा, शिक्षणाची कमतरता आणि आरोग्य सुविधा यामुळे सर्वसामान्यही हतबल झाले आहेत. राज्यातील शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आणि ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षण पुरवण्यासाठी काहीही धोरणात्मक उपाययोजना राबवण्यात आलेल्या नाहीत. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे जीवनमान ढासळले आहे, ज्याचा प्रतिकूल परिणाम आर्थिक स्थैर्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुका होत आहेत, मात्र त्यात सर्वसामान्यांचे हे मुद्दे शोधूनही सापडत नाहीत. प्रत्येकाची आपला पक्ष, आपली उमेदवारी आणि आपले नॅरेटिव्ह यांच्याशीच बांधिलकी आहे. या गदारोळात सामान्यांच्या प्रश्नांना कुणीही वाली नाही. ज्या निवडणुकीत आपल्या मुद्यांचा विचार होत नाही त्या निवडणुकीत मतदान करून काय फायदा, असा विचार जर मतदारांमध्ये रुजला तर मात्र मतदानाचा टक्का निश्चितपणे घटेल.

# डाळिंबाच्या बागेत कोणती आंतरपीके घ्यावीत

**दि. ४ विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंब पिकात मोठ्या प्रमाणात सुत्रकृमींचा प्रादुर्भाव होताना दिसत आहे आपण निवडलेली आंतरपिके त्याला कारणीभूत ठरू शकतात त्यामुळे बागेत कोणती आंतरपीके घ्यावीत आणि कोणती घेऊ नयेत? हे पाहणे जरुरीचे आहे.



ताग व इतर हिरवळीची खते असलेली पिके डाळिंबामध्ये आंतरपिक म्हणून घ्यावीत. नंतर ही पिके जमीनीमधे गाडावीत. त्यामुळे मातीतील फायदेशीर असणारी सुक्ष्मजीवांची संख्या वाढते व जमिनीचा पोत सुधारतो.

मका, गहू, ज्वारी, बाजरी, मोहरी ही पिके घेतल्याने सुत्रकृमींच्या संख्या कमी होते. सुत्रकृमीचा प्रादुर्भाव झालेल्या बागेत अफ्रीकन झेंडू (वाण-पुसा बंसती गेंदा) ची लागवड करावी. चांगल्या परिणामांसाठी हे पिक सलग ६ ते ७ महिने ठेवावे.

आंतरपिक म्हणून कांदा, टोमॅटो, मिर्ची, वांगी, बटाटा, ढोबळी मिरची, गाजर, हरभरा, उडीद, तुर, मुग, राजमा, सोयाबीन, वेलवर्गीय पिकांमध्ये काकडी, टरबुज, खरबुज, फुलांमध्ये जरबेरा, ग्लॅडीओलस इ. सुत्रकृमीच्या वाढीस पोषक ठरणारी पिके घेणे टाळावे.

वेलवर्गीय पिकांमुळे किटकांचा प्रादुर्भाव वाढतो त्यामुळे अनेक रोगांचा, सुक्ष्मजीवांचा फैलाव वाढतो; म्हणून त्यांचा आंतरपिक म्हणून वापर टाळावा. त्याचबरोबर फळपिके, पालेभाज्या आणि फुलपिके यात फुलकिडीचा प्रादुर्भाव सातत्याने होत राहतो; त्यामुळे अशी पिके घेणे टाळावे.

पालेभाज्या व फुलपिकांमध्ये अनेक किटकांच्या सुप्त अवस्था जतन होतात म्हणून ही पिके आंतरपिक म्हणून टाळावीत.




# पोटाचे टायर्स सुटलेत-कंबर लठ्ठ दिसते? २१ दिवस हे पदार्थ खा, मेणासारखी वितळेल चरबी-फिट दिसाल

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक -**

बारीक होण्यासाठी काही लोक खूप मेहनत करतात तरीसुद्धा हवातसा परिणाम दिसून येत नाही. शरीराचं फॅट सुटतच राहते. याच फॅटच्या मदतीनं तुम्ही बारीक होऊ शकता. शरीरात २ प्रकारचे फॅट असतात. त्यातील एक प्रकार दुसऱ्या फॅटला कमी करण्याचे काम करतो. लाईफस्टाईल एक्सपर्ट ल्यूक कौटिनहो सांगतात की, शरीराचं फॅट ब्राऊन फॅट आणि व्हाईट फॅट असे विभागले जाते. ब्राऊन फॅटच्या मदतीनं व्हाईट फॅट कमी करून वेट लॉस करता येते. फॅट कोणत्या जागेवर असतात ते समजून घेऊ



ब्राऊन फॅट कॅलरीज बर्न करून शरीराला गरम ठेवते. लहान मुलांच्या शरीरावर हे फॅट खूप असते आणि वयस्कर लोकांमध्ये थोडं कमी असते. जर तुमचे मान आणि खांद्याजवळ फॅट असेल तर व्हाईट फॅट कमी करण्यास मदत होते. व्हाईट फॅट पोट, मांड्या, कुल्हे आणि हातांना चिकटलेले असते. ज्यामुळे अनेक मेटाबॉलिक डिसॉर्डर्स होऊ शकतात. ब्राऊन फॅट एक बॉडी हिटर असून फॅट एनर्जी स्टोरेज त्यामुळे होते.

एक्सपर्ट्सच्यामते ब्राऊन फॅट कॅलरीज बर्न करून हिट तयार करतात. जेव्हा ते एक्टिव्हेट होतात तेव्हा शरीर व्हाईट फॅट सेल्सकडून एनर्जी घेते. तुमचे ब्राऊन फॅट जितके एक्टिव्ह असेल तर व्हाईट फॅट तितकंच कमी होईल.

ब्राऊन फॅट एक्टिव्ह कसं कराल

५ ते ८ मिनिटं थंड पाण्यानं अंघोळ करा किंवा थंड एसीमध्ये राहा. ३० ते ४५ मिनिटं कार्डिओवॅस्क्युलर व्यायाम, हाय इंटरव्हल ट्रेनिंग किंवा वेट ट्रेनिंग, झोपण्याची आणि उठण्याची निश्चित वेळ ठेवा.

### ब्राऊन फॅट सेल्सची ताकत वाढवणारे युसीपी १ युक्त फळं खा

कांदा, लाल मिरची, शेंगदाणे, ग्रीन टी, सोयाबीन, लिंबू, ताज्या हळदीचं पावडर, ड्राय ऑर्गेनो, सफरचंद, द्राक्ष, चेरी, फळं, ब्लू बेरी, ब्लॅक बेरी, पत्ता कोबी, शिजवलेला गाजर, शिजवलेला टोमॅटो, भोपळा, ब्लॅक कॉफी, अक्रोड, मशरूम, डाळिंब, स्ट्रोबेरी, ऑलिव्ह ऑईल, क्रुसिफेरस फुड्स, ओमेगा-३ फूड्स या पदार्थांचा आहारात समावेश करा.

# बीरव्याची मैफिल अन डफळी च्या निनादात रंगला ढाल महोत्सव

## आ प्रतापदादा अडसड यांनी केले पूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धामणगाव रेल्वे**

चका चका चांदणी यो गोवारियो बिनो गायनसे कोटा भरे घरघर देवो आशिष गा.अश्या बीरव्याची मैफिल अन डफळी च्या निनादात विदर्भातील साडे पाच हजार गावात आदिवासी गोंडगोवारीचा ढाल महोत्सव रंगला असून कावली येथे आ प्रतापदादा अडसड यांनी ढाल पूजन महोत्सवात सहभागी होऊन ढालीचे पूजन केले.आदिवासी गोंडगोवारी समाजाची संस्कृती म्हणजे ढाल पूजन उत्सव, आद्य धर्मगुरू पाहंदी पारी कुपार लींगो व माता जंगो रायताड यांच्या प्रतिकात आपल्या मृत पूर्वजांच्या रुपात दोन मुखी पुरुषाची व चार मुखी स्त्री च्या नावाची ढाल बनवून हिंदू धर्माच्या लक्ष्मी पूजेच्या दिवशी ही पूजा करण्यात आली आज पाड्व्यालाआदिवासी गोंडगोवारी जमातीच्या युवकांनी व वडीलधारी व्यक्तींनी पायाला गुंघरु बांधुन आपले पारंपारिक आकर्षक नृत्य सादर केले

इतिहासाची परंपरा जपतेय आदिवासी गोंडगोवारी जमात

आद्य धर्मगुरू पाहंदी पारी कुपार लींगो व माता जंगो रायताड यांनी मिळून काट सावरी च्या झाडाखाली सगा सामाजिक व्यवस्था निर्माण करून कोया धर्माची स्थापना केली . व माता कली कंकली च्या मुलांना कोया धर्माची दीक्षा प्रधान केली होती. व जय सेवा चा मूलमंत्र नुसार समाजाची निस्वार्थ सेवाचा भाव मानत ठेऊन कार्य करावे. व समाज संरचना केली हाती. या मुळे समाजामध्ये एक नवी दिशा अर्पण केली. व सगा बिडार ( गोंदोला) परिवारात प्रेमभाव आणि एकमेकांच्या निस्वार्थ सेवा चा भाव निर्माण झाला. आणि गोवारी (कोपाल ) ही जमात गोंदोला परिवाराचा एक अंग आहे. म्हणून आदिवासी गोडगोवारी जमात ही काट सावरीच्याच झाडाखाली ढाल पूजा करून उभी करतात. यामुळे समाजात एक आंनदोउत्सव व शांतता नांदावी म्हणून ढालीच्या प्रतिकात जंगो आणि लिंगो यांच्या प्रतिकात आपल्या पूर्वजांच्या नावाने ढाल निर्माण करून पूजन व उत्सव सादरा केला जातो.



कावली मध्ये उत्सवकावली येथे दिवसभर हा उत्सव साजरा करण्यात आला यात आ प्रतापदादा अडसड, माजी जी प बांधकाम सभापती रामदास निस्ताने भाजपा व्यापारी आघाडीचे प्रदेश सचिव विलास बुटले, आदिवासी गोवारी युवा शक्ती संघाचे राज्य संघटक मोहन राऊत विपिन दगडकर,विशाल खडसे, सरपंच जांभळे उपसरपंच संदीप इंगळे ,गजानन पाटील, गजानन गुरुभेले मधुकर नेवारे किशोर भोयर योगेश नेवारे प्रवीण चौधरी, शिवा लसवंते , अतुल नागोसे गजानन नेवारे निलेश नेवारे बाबाराव राऊत मुकीदा काळसर्फे, सुदाम ठाकरे अर्जुन सोनवणे यांच्यासह समाजातील शेकडो कार्यकर्ते सहभागी होते.

# शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्रासाठी मुद्रांक शुल्क माफ; आदेश धडकले

## जिल्हाधिकाऱ्यांना पत्र : तहसीलदार, एसडीओ यांना देणार सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती :** शासकीय कामकाजासाठी ई-सेवा केंद्रांमध्ये ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची मागणी केली जात असल्याचे निदर्शनात येत आहे. शासकीय कार्यालय व न्यायालयासमोर सादर करण्यात येणारे प्रतिज्ञापत्रासाठी मुद्रांक शुल्क शासनाने माफ केले आहे. त्यामुळे मुद्रांकांची मागणी करण्यात येऊ नये, असे पत्र नोंदणी महानिरीक्षक मुद्रांक निरीक्षक यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना गुरुवारी दिले आहे. जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसीलदार व एसडीओ यांना याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, असे या पत्रात स्पष्ट केले आहे. शैक्षणिक व शासकीय अधिकारी किंवा शासकीय कार्यालये व तथा न्यायालयासमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क यापूर्वीच माफ करण्यात आलेले आहे. या कामांसाठी मुद्रांक विकत घेण्याची आवश्यकता नसल्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

**यासाठी मुद्रांक शुल्क माफ-** शासकीय कार्यालयात जात प्रमाणपत्र, प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, वास्तव्य प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र मिळण्या साठी शासकीय अधिकाऱ्यांसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केलेले आहे. याशिवाय काही प्रमाणपत्रासाठी १०० व २०० रुपयाऐवजी ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क करण्यात आल्याची

सुधारणा १४ ऑक्टोबरच्या राजपत्रान्वये करण्यात आल्याचे पठात नमूद आहे.

# रेल्वेत नोकरीची सुवर्णसंधी; ग्रुप डी पदांसाठी भरती; ३० नोव्हेंबर अर्ज करण्याची

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**

रेल्वेत सरकारी नोकरी करावी, अशी अनेकांची इच्छा असते. जर तुम्हीही नोकरीच्या शोधात असाल तर ही माहिती खास तुमच्यासाठी. रेल्वेत सध्या स्काउट्स आणि गाइट कोट्यअंतर्गत ग्रुप डी पदासाठी भरती जाहीर करण्यात आली आहे.

या नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज करावे.

रेल्वेतील या नोकरीसाठी अर्जप्रक्रिया १ नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाली आहे. या नोकरीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० नोव्हेंबर २०२४ आहे. या नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांनी .ीलीक्षि.ीस या वेबसाइटला भेट देऊन अर्ज करु शकतात.या नोकरीसाठी तुम्ही लवकरात लवकर अर्ज करा.

या भरती मोहिमेत मान्यताप्राप्त बोर्डातून इंटरमीडिएट परीक्षा पास केलेली असावी. त्याचसोबत बॅचलर आणि पदव्युतर पदवी प्राप्त उमेदवार अर्ज करु शकतात. तसेच टेक्निशियन पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने

**नौकरी विशेष**

आयटीआय उत्तीर्ण उमेदवार अर्ज करु शकतात.

या नोकरीसाठी १८ ते ३३ वयोगटातील उमेदवार अर्ज करु शकतात. राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव प्रवर्गात सूट देण्यात आली आहे.या नोकरीबाबत सर्व माहिती रेल्वे भरती बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटवर देण्यात आली आहे.



या नोकरीसाठी अर्ज करताना उमेदवारांना ५०० रुपये अर्ज फी भरावी लागणार आहे. तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना २५० रुपये फी भरावी लागणार आहे

**या नोकरीसाठी अर्ज कसा करावा?** -या भरती मोहिमेत अर्ज करताना सर्वप्रथम .ीलीक्षि.ीस या वेबसाइटला भेट द्या.

त्यानंतर होमपेजवरील नोटिफिकेशनवर जावे लागेल.

यानंतर भरती संबंधित अर्जावर क्लिक करावे लागेल.

यानंतर न्यू रजिस्ट्रेशन लिंकवर क्लिक करा. यानंतर अर्जप्रक्रिया पूर्ण करुन महत्त्वाचे कागदपत्रे अपलोड करा.

यानंतर शुल्क भरुन फॉर्म सबमिट करा आणि फॉर्मची प्रिंट आउट तुमच्याजवळ ठेवा.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



# बेलोरा विमानतळावरून विमानांना उड्डाण घेण्यास मे पर्यंत अवकाश

## वन्यजीवांची शेकडोंची संख्या ठरत आहे बाधा , वन विभाग आणि विमानतळ विकास प्राधिकरण हतबल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अमरावती : –** अमरावतीकरांच्या स्वप्नातील बेलोरा विमानतळ येथून आणखी काही महिने विमाने आकाशात उडणार नाहीत, कारण धावपट्टी तयार असली, तरी यावर वन्यजीवांची जोरदार बॅटिंग सुरू असल्याने विमानांना आकाशातील झेप घेण्यास तूर्तास ब्रेक लागलेला आहे.

अमरावती नजीकच्या बेलोरा विमानतळावरून विमानांची सेवा सुरु व्हावी, याकरिता या विमानतळाचे विस्तारीकरण करण्यात आले. १८०० मीटर लांब अशी धावपट्टी सज्ज झालेली असून, विमानतळाला प्रवाशांची आणि प्रवाशांना विमानांची प्रतीक्षा आहे. मध्यंतरी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच अमरावती विमानतळ येथूनपुणे, मुंबई सेवा सुरू होईल, असा प्रचार राजकीय नेत्यांनी केला. मात्र, महाराष्ट्र विमानतळ विकास




प्राधिकरणाल 'अंदर की बात' ठाऊक होती, कारण इमारत, धावपट्टी, टेहाळणी मनोरा सज्ज असला, तरी विमानतळाच्या आत असणारे वन्यप्राणी जोपर्यंत बाहेर काढले जात नाही, तोपर्यंत विमानसेवा सुरू करणे शक्य नाही. कारण,

### विमानतळाच्या आत ३०० पेक्षा जास्त नीलगायी

अलीकडे हत्तीच्या आकाराच्या नीलगायी धावपट्टीवर फिरतांना दिसून येत आहे.

विमानतळ विकास प्राधिकरणाने बेलोरा विमानतळाच्या आत असलेले वन्यप्राणी त्यातही ३०० पेक्षा जास्त नीलगायी पकडण्याची जबाबदारी वन विभागाकडे सोपविली आहे. जवळपास तीन महिन्यांपूर्वी विमानतळावरील वन्यजीव बंदिस्त करून त्यांना ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पात सोडण्याबाबत करार करण्यात आला आहे. त्याकरिता ताडोब्यातून खास वाहन बेलोरा विमानतळावर दाखल झाले. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून 'बोमा' पद्धतीचा वन्यजीवांवर काहीं फरक पडलेला नाही. त्यामुळे वन विभाग आणि विमानतळ विकास प्राधिकरण हतबल झाले आहे.

**मे नंतरच उडणार विमान**

बेलोरा विमानतळ घेण्यासाठी पूर्णपणे सज्ज झाले असले तरी वन्यजीवांची शेकडोंची संख्या आणि बोमा पद्धतीत ते अडकत नाही. त्यामुळेविमानतळावरुन मे महिन्यांनंतरच विमानांचे उड्डाण होईल, असे चित्र आहे.

### दाट झाडेझुडपे, उंच गवत अडसर

बेलोरा विमानतळाच्या आतील भागात वन्यजीवांचे रेस्क्यू करताना उंच–उंच गवत, दाट झाडेझुडपांमुळे वन विभागाला अनेक संकटाचा सामना करावा लागत आहे. गत आठवड्यात एका नीलगायीने दोन वनकर्मचाऱ्यांना जखमी केल्याची माहिती आहे. अमरावती वन विभागाने चांदूर रेल्वे, वडाळी, परतवाडा, मोर्शी या वनपरिक्षेत्र आणि रेस्क्यू पथकातील १०० वन कर्मचारी तैनात करण्यात आले आहे.

# आता पूर्वीसारखी कोणाची मक्तेदारी राहिली नाही; भुजबळांचा जरांगेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नाशिक**

मनोज जरांगे यांनी मराठा आंदोलकांनी कोणाला पाडायचे याची यादी जाहीर केली आहे. यामुळे राज्यातील राजकारणाला वेगळे वळण लागणार आहे. दुसरीकडे ओबीसी आंदोलक देखील १०० च्या वर उमेदवार जाहीर करणार आहेत. अशातच मंत्री छगन भुजबळ यांनी पूर्वीसारखी कोणाची मक्तेदारी राहिली नाही, अशा शब्दांत जरांगे यांच्यावर टोला लगावला आहे.

बंडखोरी हा निवडणुकीचा एक भाग आहे. जिल्हा परिषद, नगर पालिका यासह सर्वच निवडणुकीत देखील बंडखोरी होत असते. प्रत्येक मतदार संघात महायुती, महाविकास आघाडीत बंडखोरी आहे. सरासरी ३० उमेदवार प्रत्येक विधानसभा क्षेत्रात आहेत. उद्या ४ वाजता खरे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर खऱ्या अर्थाने निवडणुकीला सुरुवात होईल, असे भुजबळ म्हणाले.

सर्वच समाजाचे उमेदवार माझ्या विरोधात रिंगणात उभे आहेत. त्यामुळे एकट्या मराठा समाजाला टार्गेट करण्यात काही अर्थ नाही. माझ्या सर्व विकासकामांमध्ये मराठा, दलित, आदिवासी, ओबीसी सर्व समाज सोबत आहेत. सर्वच जाती धर्माचे लोक मला मतदान करतील अशी केलेल्या विकास कामांमुळे मला खात्री आहे. त्यापुढे जावून सर्व पक्षाचे लोक देखील छगन भुजबळ म्हणून मला मतदान करतील असेही भुजबळ म्हणाले.

जरांगे–झिरवाळ भेटीवर बोलताना भुजबळ म्हणाले की, त्यांना वाटते भेटल्याने आपल्याला फायदा होईल पण आता पूर्वीसारखी कोणाची मक्तेदारी राहिली नाही. आता एका घरात चार वेगवेगळ्या विचाराचे, पक्षाचे लोक काम करत असतात. मतदार हे वैचारिक झाले आहेत. विचारधारा ही पक्षाच्या स्तरावर असते, तिथे सर्व गोष्टी तपासल्या जातात. याचा विचार करून लोक योग्य ठिकाणी मतदान करतात. त्यांना सर्व कळते मत कोणाला दिले पाहिजे, असेही ते म्हणाले.



# पत्रकारांनी स्वत:च्या सन्मानाशी तडजोड करू नये

## अनिल अग्रवाल यांचे प्रतिपादन







## वाढदिवसानिमित्त पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार, अभिष्ठचिंतन सोहळा आयोजन समितीचा उपक्रम

### पाल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा सन्मान

अनिल अग्रवाल अभिष्ठचिंतन सोहळा आयोजन समितीतर्फे तीन वर्षांपासून पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येतो. जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण पत्रकारांची एकजुट दिसावी हा सोहळ्याच्या आयोजनामागील उद्देश असला तरी पत्रकारांच्या पाल्यांचे कौतुक व्हावे, त्यांना भावी आयुष्यासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांनीही यशाची शिखरे गाठून उंच गगनभरारी घ्यावी, हा आयोजनामागील प्रमुख हेतू असल्याचे अनिल अग्रवाल म्हणाले. कामाच्या व्यापामुळे पत्रकारांना आपल्या कुटुंबाला हवा तसा वेळ देता येत नाही. त्यामुळे बरेचदा अशा पत्रकारांना पाल्यांकडून मिळणार्या सन्मानापासून वंचितही राहवे लागते. अशा कार्यक्रमांमधून पत्रकार पित्याप्रती त्याच्या पाल्यामधील सन्मान वृद्धिंगत होण्यास निश्चितच मदत मिळते, असे अग्रवाल म्हणाले.

### या गुणवंतांचा सत्कार

या गुणगौरव सोहळ्यामध्ये लेखा चेतन कोठारी, पूर्वा भूषण यावले, यश भूषण यावले, प्रतिक गोपाल डहाके, ओम गोपाल डहाके, पियुश प्रणय निर्वाण, चैतन्य मंगेश वानखडे, अज्वेता जगदिश चतुर, उत्कर्ष वैभव बाबरेकर, सुप्रिया नितीन टाले, श्रेया सुधिर भारती, विशेष मनोज गवई, कनक नयन मोंढे, काजल जितेंद्र फुटाणे, आर्यव्रत दिनेश खडसे, सार्थक संजय बनारसे, विहान मंगेश तायडे, आराध्य गजेंद्र बडनेरकर या गुणवंत पाल्यांचा पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि भेटवस्तू प्रदान करुन सत्कार करण्यात आला.

### पत्रकारांनी संघटित राहण्याची गरज : नानक आहुजा

समाजात मान–सन्मान मिळत असला तरी अर्थार्जन करुन योग्य प्रकारे आपला व कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यात प्रत्येक पत्रकार यशस्वी होतोच, असे नाही. त्यासाठी जिद्द, चिकाटी व श्रम करण्याची तयारी अंगी बाळगणे आवश्यक आहे. यावर प्रतिदिन अखबारचे संपादक नानक आहुजा यांनी आपल्या भाषणात भर दिला. पत्रकारांनी संघटित राहुन आपली प्रगती साध्य करुन घेणे काळाची गरज आहे. असे नानक आहुजा म्हणाले. अनिल अग्रवाल यांना वाढदिवसाच्या सदिच्छा देताना आहुजा यांनी अग्रवाल यांच्याद्वारे पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांची प्रगती व त्यांच्या न्याय्य हक्कासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची प्रशंसा केली.



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती :** पत्रकार हा समाजाचा सजग प्रहरी आहे. पत्रकाराएवढी समाजसेवा समाजातील दुसरा कोणताही घटक करु शकत नाही. त्याचा मान–सन्मान राखला जाणे आवश्यक आहे. पत्रकारांनीही स्वत:चे महत्व लक्षात घेउन आपल्या सन्मानाशी तडजोड करु नये. वेळप्रसंगी त्यांनी आपला सन्मान स्वत:च मिळवून घ्यावा, असे प्रतिपादन दै. अमरावती मंडल व दै. मातृभूमिचे संपादक आणि अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी केले.अनिल अग्रवाल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्ह्यातील पत्रकार व वार्ताहरांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आज आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी अनिल अग्रवाल बोलत होते. अनिल अग्रवाल अभिष्ठचिंतन सोहळा आयोजन समितीने पत्रकार संघाच्या वालकट कंपाउंड स्थित सभागृहात या सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दै. प्रतिदिन अखबारचे संपादक नानक आहुजा सपत्निक उपस्थित होते. त्यांच्यासोबतच दै. हिंदुस्थानचे संपादक उल्हास मराठे, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष चंदु सोजतिया, सरचिटणिस प्रफुल्ल घवळे, सुधिर भारती हेसुद्धा मंचावर विराजमान होते.पत्रकार हा कोणत्याही व्यक्तीला आपल्या लेखनीतून मोठे करण्याची ताकद ठेवतो. पत्रकाराचे समाजासाठी सर्वात जास्त योगदान असते. पण बरेचदा त्यांच्या कामाचे पाहीजे तसे मोल केले जात नाही. अशावेळी पत्रकारांनी कोणाचीही भीड न ठेवता आपण कुठेही मागे नसल्याचे दाखवून दिले पाहीजे. पत्रकारितेसोबतच अन्य क्षेत्रातही यश प्राप्त करण्याची आम्ही दानत ठेवतो, हे पत्रकारांनी आपल्या कृतीतून दाखवून द्यावे, असे आवाहन अनिल अग्रवाल यांनी केले.दै. हिंदुस्थानचे संपादक उल्हास मराठे यांनी आपल्या भाषणातून अनिल अग्रवाल यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. त्यांच्या नेतृत्वात पत्रकार संघाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पत्रकारांच्या उत्थानासाठी सुरु असलेल्या उपक्रमांचीही मराठे यांनी प्रशंसा केली. चंदु सोजतिया यांनीही अनिल अग्रवाल यांच्या नेतृत्वात जिल्हा पत्रकार संघाने अनेक रखडलेली कामे अल्पावधीत पूर्णत्वास नेल्याचे सांगितले. पत्रकारिताच नाही तर अन्य क्षेत्रातही आपल्या चिकाटीच्या जोरावर अनिल अग्रवाल यांनी उल्लेखनिय यश प्राप्त करुन समाजात आपले विशेष स्थान निर्माण केले असल्याचे ते म्हणाले.यावेळी मोर्शी येथील वार्ताहर गोपाल डहाके, धामणगांव रेल्वे येथील वार्ताहर चेतन कोठारी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल घवळे तर संचालन गजेंद्र बडनेरकर यांनी केले. गौरव समारंभाचे संचालन मंगेश तायडे तर आभार प्रदर्शन सुधिर भारती यांनी केले. यावेळी विजय ओडे, अनूप गाडगे, जितेंद्र दोषी, संजय बनारसे, प्रणय निर्बाण, नयन मोंढे, संतोष शेंडे, अरुण तिवारी, सुरेंद्र तिवारी, पवन श्रीवास्तव, जितेंद्र फुटाणे, नरेंद्र निकम, हेमंत निखाडे, विजय सुने, गोपाल डहाके, प्रकाश मेंढे, त्र्यंबक संभावित, मोहम्मद सादिक , दिनेश खेडकर, बंडू धवने, प्रेम कारेगावकर, दिनेश खडसे, सचिन पाटील, मंगेश वानखडे, अनिरुद्ध उगले, सागर डोंगरे, मनोहर बारसे, राजकुमार इंगळे, शुभम अग्रवाल, नितीन टाले, विवेक दोडके, चेतन कोठारी, राजाभाउ मनोहरे, मनोज गवई, जगदिश चतुर, पुजा भारती, वैभव बाबरेकर, प्रिती कोठारी, वंदना गोपाळे, वैदेही खडसे, सुदेश चव्हाण, योगेश अग्रवाल, विजय गायकवाड, मयुर चौधरी आदी पत्रकार उपस्थित होते.

# अनोखी बलिप्रतिपदा : आता तरी मतदान करणार ना ?

## पाळीव पशूंनी दिला मतदानाचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चांदूर रेल्वे –** सध्या राज्यात दीपोत्सवाचा माहौल आहे. यासह विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुद्धा जोर धरत आहे. एवढे असूनही राज्यातील काही ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी राहते. हि टक्केवारी वाढावी म्हणून निवडणूक आयोगामार्फत स्वीप हा मतदान जनजागृती संदर्भात उपक्रम राबविण्यात येतो. धामणगाव विधानसभा क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढावी दीपोत्सवातील विविध सणांचा आधार घेण्यात आला. आज बलीप्रतिपदाच्या मुहूर्तावर धामणगाव रेल्वे मतदार क्षेत्रातील चांदूर रेल्वे तालुक्यातील अनेक गावांमध्ये गाई गोंदण उत्सव निमित्ताने पाळीव प्राण्यांची रंगरंगोटी करून त्याद्वारा मतदान जनजागृती करण्याचा अफलातून प्रयोग करण्यात आला. देशात कदाचित अश्या प्रकारचा निवडणूक जनजागृतीचा पहिला प्रयोग असावा.विधानसभा निवडणूक निमित्याने जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्येक विधानसभा क्षेत्रात स्वीप कक्षाची निर्मिती करण्यात आली. सध्या दीपावली उत्सव असल्याने शाळांमध्ये दीपावली उपक्रमाचे आयोजन केले होते.यात रांगोळी रेखाटन, पणती सजावट, फलक सजावट, आकाश कंदील निर्मिती, आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. गाई गोंदण उत्सवाच्या निमित्याने मांजरखेड, लालखेड, पळसखेड, मालखेड, दहीगाव, चांदूर रेल्वे सारख्या गावांमध्ये पशू पालकांनी मी मतदान करणार, आपले हक्क आपले मत, मतदान करा देश घडवा, मतदान करा देश बळकट करा, लोकशाही करा पक्की..मतदान करा नक्की.. आदी मतदान जनजागृतीचा संदेश आपल्या पाळीव प्राण्यांच्या माध्यमातून सर्व सामान्य मतदारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण मतदारांच्या तुलनेत शहरी मतदारांची टक्केवारी कमी असल्याने किमान पशूपालनाच्या माध्यमांतून एक आगळावेगळा संदेश या समाजाला जात आहे. या जनजागृतीद्वारा किमान मतदानाची टक्केवारी वाढेल असा आशावाद स्वीपचे नोडल अधिकारी संदीप बोडखे यांनी व्यक्त केली आहे.आता तरी मतदान करणार का ?दिवाळी उत्सव असल्याने अनेक जणांनी बाहेरगावी पर्यटनाचे बेत आखले आहे. उत्सव लगत २० नोव्हेंबरला मतदान करीता सुट्टी असल्याने पर्यटन न करता मतदान करावे. आम्ही ग्रामीण भागातील पशुपालक असून सुध्दा आमच्या गुरं – ढोरांमुळे माध्यमांतून मतदान करण्यासाठी गाई गोंदणच्या पर्वावर एक मतदान जनजागृतीचा प्रयत्न केला असल्याचे लालखेड येथील पशूपालक तुळशीराम चव्हाण यांनी सांगितले.





# लेकींचा सन्मान हाच भाऊबीज सोहळा- सत्यपाल महाराज

## सैनिक कैलाश हिवराळे सेवापुर्ती सोहळ्याला जनसागर उसळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ टाकरखेडा संभु** फोटो टेलिग्राम २दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत आहे, ही खुप मोठी चिंतनीय बाब आहे. यासाठी माझ्या युवक बांधवांनो संतमहापुरुषांच्या विचारांच्या संगतीत राहा तसेच माझ्या बहिणींनो आई- वडीलांना विश्वासात घेवून आपल्या संसाररुपी जिवनाचे सार्थक करा. आज महिलांचे संरक्षण, तिचा सन्मान करणे हि काळाची गरज आहे, यातच खरी भाऊबीज साजरी होईल, अशी प्रबोधनवाणी समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी आष्टी येथे विशद केली.सैनिक कैलाश प्रकाश हिवराळे सेवापुर्ती गौरवसोहळानिमित्त भातकुली तालुक्यातील आष्टी (कोळ्यांची) येथे समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा सत्यवाणी सप्तखंजेरीप्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सैनिक कैलाश हिवराळे व माजी सैनिकांचा सत्कार सत्यपाल महाराज व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. आपल्या सप्तखंजेरीवर थाप देत सत्यपाल महाराज म्हणाले, दानात दान सर्वश्रेष्ठ मतदान आहे, येणा-या २० नोव्हेंबर ला सर्वांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा,असे आवाहन त्यांनी जनसमुदायाला केले. किसान व जवान हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहात, त्यांचा सदैव आदर ठेवा.कार्यक्रमापुर्वी रविदादा मानव, रामपाल महाराज, पोर्णिमाताई सवई, प्रभाकर हिवराळे यांनी ग्रामगीताप्रणित आपले विचार मांडले. यावेळी ऋषिकेश महाराज रेळे, विवेक महाराज कुरुमकर, प्रतिभा साहित्य संघाचे मंगेश वानखडे,




मराठी पत्रकार संघाचे भातकुली तालुका अध्यक्षपत्रकार संतोष शेंडे, कमलपाल महाराज, विजय माथने, शिवानंदपाल तायवाडे, काशीनाथ फुटाणे, ज्ञानेश्वर गीते, प्रा. दिपक धुरंधर, मेजर संतोष आढे , विनोद माथुरकर, क्रांती काळे, आष्टी सरपंच दिलीप जवंजाळ उपसरपंच दिनेश डवले,पोलीस पाटील प्रवीण प्रधान, महर्षी वाल्मीकी नवदुर्गोत्सव मंडळ सामदा काशीपूरचे गजानन भगत, गोपाल खेडकर, गजानन जुमळे, किरण आढे, आकाश किरडे यांची उपस्थीती होती. सत्यपाल महाराजांना कार्यक्रम सादर करण्यास हार्मोनियम वादक गजानन चिंचोळकर, तबलावादक रोशन राऊत, साथसंगत सुनिल चिंचोळकर, राजेश काईंगे यांनी साथ दिली.बॉक्स -ज्या महिलांचे पती, मुलगा सिमेवर सैनिक तसेच पतीछत्र हरविलेल्या माताभगिंनांना साडी देवून सत्यपाल महाराजांनी त्यांचा सन्मान केला.

## कापसाच्या आयातीवर तात्काळ बंदी घालून हमीभावाने कापूस खरेदी करा

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून केली मागणी.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मुंबई-** कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचे उत्पादन घेतात. राज्यात भरपूर कापूस उत्पादन होत असताना २२ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भिती आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस महामंडळाला (उउख) हमीभावाने कापूस खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणतात की, सध्या कापसाचे भाव ६५०० ते ६६०० रुपये प्रति क्विंटल असून हा भाव ७१२२ रुपये या हमीभावापेक्षा कमी आहे. बाजारात कापसाला भाव नसल्याने शेतकऱ्यांनी कापूस विकलेला नाही. महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकरी आधीच संकटात आहे, कमी भाव,शेती अवजारांवर १२ ते १८ टक्के जीएसटी आणि अवकाळी पाऊस या दुष्टचक्रात कापूस उत्पादक शेतकरी सापडला असून खराब हवामानामुळे यावेळी १९ लाख हेक्टरील कापूस क्षेत्राचे नुकसान झाले आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेली नुकसान भरपाईही अद्याप कागदावरच आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना केवळ विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी आहे.

## अपक्ष उमेदवारी अर्ज भरणाऱ्या इच्छुकांसमोर अनामत रक्कम वाचविण्याचे मोठे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती :** विधानसभा निवडणुकीत गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या इच्छुकांनी थेट अपक्ष उमेदवारी अर्ज सादर केले आहेत. परंतु आता अर्ज सादर करताना भरलेली अनामत रक्कम वाचविण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. कारण एकूण वैध मतांच्या तब्बल एक षष्ठांश मते मिळाली तरच ही अनामत रक्कम परत मिळेल, अन्यथा ती जप्त होईल. यातील बहुतांश उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होण्याचीच शक्यता मागील निवडणुकांचा अनुभव पाहिल्यास वर्तविण्यात आली आहे.

गेल्या निवडणुकीत जिल्ह्यातील आठ मतदारसंघांमध्ये ११७ उमेदवार रिंगणात होते. त्यातील केवळ १७ उमेदवार अनामत रक्कम वाचविण्यात यशस्वी ठरले. तर १०० जणांची ही रक्कम जप्त झाली. अमरावती आणि धामणगाव रेल्वेमधून सर्वाधिक २१ उमेदवार रिंगणात होते आणि प्रत्येकी १९ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. १४ च्या निवडणुकीत १३४ उमेदवार रिंगणात होते, यापैकी ११४ उमेदवारांना अनामत रक्कम वाचविता आली नाही.



विधानसभेच्या निवडणुकीसाठी सर्वसाधारण उमेदवारासाठी अनामत रक्कम १० हजार रुपये तर अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती वर्गातील उमेदवारासाठी ५ हजार रुपये इतकी आहे. निवडणुकीत जर उमेदवार निवडून आला असेल. परंतु सर्व उमेदवारांना मिळून पडलेल्या एकूण वैध मतांच्या एक षष्ठांशापेक्षा कमी मते मिळाली असल्यास विजयी उमेदवाराचीही अनामत रक्कम जप्त होईल.उमेदवाराला एकूण वैध मतांच्या एक षष्ठांश म्हणजेच १६.६७ टक्के मते मिळाली नाहीत, तर त्याची अनामत रक्कम जप्त होते. उमेदवारी अर्ज माघारीसाठी अंतिम मुदत ४ नोव्हेंबर आहे. या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येईल.

दरम्यान, उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरवून नाकारले गेले असेल, तर अनामत रक्कम परत मिळते. उमेदवाराने विहित कालावधीत उमेदवारी मागे घेतली असल्यास सदरची रक्कम परत मिळेल. तसेच मतदानाच्या प्रारंभापूर्वीच उमेदवार मृत्यू पावला तर अनामत रक्कम त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीस परत केली जाईल. जे उमेदवार निवडून आलेले नाहीत, मात्र निवडणुकीत सर्व उमेदवारांना पडलेल्या एकूण वैध मतांच्या एक षष्ठांशापेक्षा जास्त मते मिळाली असतील, तरीदेखील अनामत रक्कम परत मिळेल. अनामत रक्कम परत करतेवेळी एकूण वैध मतांची गणना करताना 'नोटा'ला मिळालेली मते विचारात घेतली जात नाहीत. यावेळी किती उमेदवार रिंगणात राहतात, हे उद्या स्पष्ट होणार आहे.-

## दोन खासगी बसची धडक; एक ठार, २० प्रवासी जखमी

### कारंजा-अमरावती मार्गावर वडगाव फाट्याजवळ अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४कामरगाव** दोन खासगी प्रवासी बसची समोरासमोर धडक झाल्याने चालक जागीच ठार तर १५ ते २० प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी (दि. ३ नोव्हेंबर) पहाटे २ वाजताच्या दरम्यान कारंजा अमरावती मार्गावरील वडगाव फाट्यानजीक बळीराजा हॉटेलजवळ घडली. श्रीधर पुंडलिक कायवाडे (४५) रा. अमरावती असे अपघातात ठार झालेल्या खासगी बसचालकाचे नाव आहे. रॉयल खासगी प्रवाशी बस्र ही अमरावतीहून कारंजाकडे येत होती. दरम्यान, वडगाव फाट्यानजीक एम, एच.३८ के. ७७९९ क्रमांकाची खुराणा खासगी प्रवासी बस अचानक समोर आल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात येते. समोरासमोर दोन्ही नाही.

बसची धडक झाल्याने यामध्ये चालक श्रीधर कायवाडे यांचा जागीच मृत्यू झाला तर



दोन्ही बसमधील १५ ते २० प्रवासी गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच कामरगाव परिसरातील अभिषेक घुले, गौरव भाकरे, वैभव घुले व तेजस घुले यांनी एवढ्या रात्री घटनास्थळावर जाऊन जखमींना अपघातग्रस्त खासगी बसमधून बाहेर काढले. चार ते पाच रुणवाहिकांच्या मदतीने जखमीना उपचारासाठी अमरावती येथे पाठविण्यात आले. दरम्यान, अपघाताचे घटनास्थळ हे मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस स्टेशन हद्दीत येत असल्याने आणि जखमींना उपचारासाठी अमरावती येथे दाखल केल्याने जखमींची नावे मिळू शकली

## हिवरखेड, शिंदी येथून दोन पिस्टलबाजांना अटक

### स्थानिक गुन्हे शाखेची दोन दिवसांतील तिसरी कारवाई.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मोर्शी -** ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने मोर्शी ठाण्याच्या हद्दीतील हिवरखेड व पथ्रोट पोलिसांच्या हद्दीतील शिंदी फाट्यावरून दोन पिस्टलबाजांना अटक केली. त्यांच्याकडून दोन देशी बनावटीचे कट्टे वजा पिस्टल व दोन जीवंत काडतुसे जप्त करण्यात आली. २ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली. १ ऑक्टोबर रोजी एलसीबीने परतवाडा येथूनदेखील देशी कटटा व जीवंत काडतुसे जप्त केली होती.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोर्शी ठाण्याच्या हद्दीत गस्त करित असतांना त्यांना आरोपी राजेश पंजाबसिंग भादा (वय ३४ वर्ष, रा. रोहना, जि. बैतुल) हा हिवरखेड येथील त्याच्या राहत्या घरी अवैधरित्या विनापरवाना देशी बनावटी पिस्टल सदृश्य लोखंडी देशी कट्टा बाळगून असल्याची माहिती मिळाली. त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्याकडे २५ हजार रुपये किमतीचा देशी कट्टा मिळून आला. त्याच्याविरूध्द मोर्शी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. तर अन्य एक कारवाई पथ्रोट पोलिसांच्या हद्दीत करण्यात अकाली. आरोपी सादिक खान साबीर खान (वय २९, रा. अजीजपुरा, अंजनगांव सुर्जी) हा देशी कट्टा बाळगून फिरत असल्याची माहिती एलसीबीला मिळाली. त्याआधारे आरोपीला शिंदी फाटयावर थांबवून त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडे देशी कट्टा व दोन जिवंत काडतुसे दिसून आली. त्याच्याविरूध्द पथ्रोट पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

**यांनी केली कारवाई-** पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मागदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वातील पोलिस उपनिरिक्षक सागर हटवार व नितीन इंगोले, अंमलदार गजेंद्र ठाकरे, रविंद्र बावणे, पंकज फाटे, त्र्यंबक मनोहर, सुनिल महात्मे, सै. अजमत, निलेश डांगोरे यांच्या पथकाने या दोन्ही कारवाया केल्या



## सेमाडोह अपघातातील सातवा बळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धारणीमेळ** घाटातील सेमाडोह येथील बहुचर्चित चावला बस अपघातात मृत्यूची संख्या सात झाली आहे. नारायण पुरी या शिक्षकाचा रविवारी दुपारी नागपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला.

धारणी तालुक्यातील रत्नापूर येथील दादासाहेब गवई माध्यमिक विद्यालयात नारायण पुरी है शारीरिक शिक्षक म्हणून कार्यरत होते. २४ सप्टेंबर रोजी झालेल्या चावला बसच्या भीषण अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर नागपूर येथे उपचार सुरू होता. यादरम्यान ते बेशुद्धावस्थेत गेले होते. उपचाराला प्रतिसाद न दिल्याने रविवारी त्यांचा मृत्यू झाला. रात्री उशिरा त्यांच्यावर मूळ गावी अंत्यसंस्कार होणार असल्याचे नातेवाइकांनी कळविले, नारायण पुरी है पूर्वी परतवाडा येथील सिद्धार्थ विद्यालयात कार्यरत होते. त्यांची रत्नापूर येथे नुकतीच बदली झाली होती. ते दर्यापूर तालुक्यातील सासन येथील रहिवासी होते.

## जंगलात बांबू कटाईसाठी गेलेल्या आदिवासी युवकाला वाघाने केले ठार

### हरिसाल परिक्षेत्रातील घटना, वाघाला जेरबंद करण्यासाठी गावकऱ्यांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मेळघाट** जंगलात वडील व काकांसोबत बांबू आणण्यासाठी गेलेल्या आदिवासी युवकावर वाघाने हल्ला करीत ठार केले. रविवारी दुपारी १२ वाजता ही घटना उघडकीस आली. या घटनेने हरिसाल, चिखली, केसरपूर पंचक्रोशीत दहशत पसरली आहे. वाघाला जेरबंद किंवा ठार करा, या मागणीसाठी परिसरातील पाचशेवर आदिवासींनी ठिय्या आंदोलन केले.

मिळालेल्या माहितीनुसार हरिराम गंगाराम धिकार (३२, रा. केसरपूर, पो. भिरोजा, ता. चिखलदरा) असे वाघाच्या हल्ल्यात ठार झालेल्या इसमाचे नाव आहे. तो विवाहित असून त्याला तीन मुले आहेत. हरिराम वडीलसोहनलाल धिकार यांच्यासह रविवारी सकाळी ९ वाजता मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गुगामल वन्यजीव विभागांतर्गत हरिसाल



वनपरिक्षेत्रातील माताखोल जंगलात बांबू आणण्यासाठी गेला होता. तिघे तीन दिशांनी बांबू कटाई करीत होते. यानंतर एका ठिकाणीदोघांचे बांबूचे भारे बांधून झाल्यानंतर एकत्र आले. परंतु, हरिराम न आल्याने दोघेही त्याला शोधण्यासाठी जंगलात गेले काही अंतरावर गेल्यानंतर त्यांना रक्त आढळले. पुढे जमिनीवर धड ओढत नेल्याच्या खुणा निदर्शनास येताच दोघांनी गावात धूम ठोकली.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देऊ सर्व जण जंगलात गेले. तेथे हरिराम धिकार याचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसून आला.

### वाघाला जेरबंद करा

आदिवासींचा ठिय्या चिखली व परिसरात यापूर्वीसुद्धा वाघाने जंगलात व घरात शिरून आदिवासींना ठार केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याची पुनरावृत्ती रविवारी झाल्याने परिसरातील हरिसाल, चिखली, कारा, नांदुरी, केसरपूर, भिरोजा, चित्री, तारूबांदा परिसरात एकच दहशत पसरली आहे. केसरपूर येथून वाघाने ठार केलेले घटनास्थळ माताखोल जंगल हे सात किलोमीटर अंतरावर आहे. तेथे पंचक्रोशीतील ५०० पेक्षा अधिक आदिवासींनी गर्दी केली होती. वाघाला जेरबंद करा किंवा ठार करा, अशी मागणी करीत आदिवासी एकवटले होते.

व्याघ्र प्रकल्पाच्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला.



# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला धक्के

## हुकूमशाही धोरणाला कंटाळून कार्यकर्त्यांचे काँग्रेस छोडो अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अचलपूर**

ऐन निवडणुकीच्या तोंडावर अचलपूर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेले बंड आणि मोठ्या संख्येने प्रहार पक्षात प्रवेश केल्यामुळे या निवडणुकीत काँग्रेसला मोठा धक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.बबलू देशमुखांचा अडेलतट्टू स्वभाव, कार्यकर्त्यांचा वारंवार होत असलेला अपमान आणि उद्धट वागणुकीमुळे कार्यकर्त्यांनी काँग्रेस छोडो अभियान राबविले आहे. मात्र या अभियानाचा फायदा नकळतपणे बच्चू कडू यांना होतांना दिसत आहे. अचलपूर विधानसभा मतदार संघात काँग्रेस पक्षाची उत्तम बांधणी आहे.लोकसभा निवडणुकीत सुद्धा पक्षाची चांगली एकजूट दिसून आली. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे या कार्यात महत्वाचे योगदान नसले तरी एकंदरीत त्यांच्या हुकूमशाही वृत्तीमुळे काँग्रेस मधील स्वाभिमानी कार्यकर्त्यांची गोची झाल्याने पक्षातील कार्यकर्त्यांची नाराजी वाढलेली आहे.काँग्रेस मध्ये स्वाभिमानी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांपेक्षा हुजरेगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना जास्त मान दिला जात आहे. पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सर्वांसमोर पान उतारा करणे, ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडे संभ्रमाच्या नजरेने पाहणे,निवडणूक आली की घरगडी सारखे राबवायचे कार्यकर्त्यांना कामगारांसारखी वागणूक द्यायची आणि निवडणूक पार पडली की कार्यकर्त्यांना साधे विचारायचे देखील नाही असा स्वभाव बबलू देशमुखांचा असल्यामुळे पक्षातील चांगले आणि स्वाभिमानी कार्यकर्ते थेट बच्चू कडू यांच्या पक्षात गेले. लोकसभा निवडणुकीत बबलू देशमुखांनी विरोधी पक्षाच्या उमेदवाराचे काम केल्याचा ठपका ठेवण्यात आला होता.श्याम मानव यांनी सुद्धा बबलू देशमुख भाजपचे स्लीपर सेल असल्याचे सांगितले त्यामुळे ही खदखद मनात घेऊन दोन दिवसांपूर्वी कुरळ पूर्णा,बोरगाव मोहना, बोपापुर,राजना, निरुळ,घाटलाडकी, करजगाव, शिरजगाव, परसोडा, चांदुर बाजार, शिराजगाव बंड,सर्फाबाद,भूगाव, बोरगाव ,अचलपूर परतवाडा तसेच अन्य गावातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी व महत्वाच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसला रामराम करत बच्चू कडू यांना जाहीर समर्थन दिले. बबलू देशमुख यांच्या मग्रूर स्वभावामुळे अजून अनेक काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रहार मध्ये जाण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.





### कार्यकर्त्यांना सन्मान मिळायला पाहिजे

सन्मान सर्वांना हवा असतो मात्र बबलू देशमुख नेहमी हुकूमशाही भूमिका निभावतात.निवडणूक आली की दलित मुस्लिम मतदारांचा वापर करायचा,त्यांचे मतदान कायम गृहीत धरायचे आणि निवडणूक झाली की त्यांना वाऱ्यावर सोडायचे.पद देतांना सुद्धा दलित आणि मुस्लिम कार्यकर्त्यांना नेहमीच उपेक्षित ठेवण्यात आले आहे त्यामुळे बबलू देशमुख यांच्या अश्या धोरणाला कंटाळून सर्व स्वाभिमानी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आता काँग्रेस ला कायमची सोडचिठ्ठी दिली आहे.बबलू देशमुखांना हा स्वभाव खूप नडणार असे जमापूर,चांदूर बाजार येथील काँग्रेस मधून प्रहार मध्ये प्रवेश करणारे कार्यकर्ते जफिर भाई यांनी म्हटले.

### बच्चू कडू कडे सर्वांनाच आदर मिळतो

गेली अनेक वर्षे काँग्रेस मध्ये निष्ठेने आणि स्वाभिमानाने आम्ही काम केले परंतु जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख हे अतिशय घाणेरडे राजकारण करून पक्षाची एकनिष्ठ नसल्याचा आरोप युवक काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष तसेच अनुसूचित जाती जमाती सेल चे चांदुर बाजार तालुका अध्यक्ष व माजी उपसरपंच शैलेश निरगुडे यांनी केला आहे. बच्चू कडू हे एकमेव नेते पूर्ण महाराष्ट्राला भारी आहेत आणि विशेष म्हणजे त्यांच्याकडे सर्वांनाच आदर मिळतो,इथे दिलेल्या शब्दाला किंमत आहे म्हणूनच मी काँग्रेस सोडून प्रहार पक्षात प्रवेश घेतला असल्याचेते म्हणाले.

# श्री क्षेत्र वायगाव येथून यशोमती ठाकूर यांच्या प्रचार यात्रेचा शुभारंभ

## उद्याला सिद्धिविनायक मंदिर येथे फोडणार प्रचाराचे नारळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

ड. यशोमती ठाकूर या श्री.क्षेत्र वायगाव येथून प्रचाराचा उद्या मंगळवार दि.५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजता श्रीगणेशा करणार आहेत. सिद्धीविनायक मंदिर श्री क्षेत्र वायगाव येथे सकाळी अभिषेक करून ड. यशोमती ठाकूर प्रचाराचा नारळ फोडतील. पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या वायगाव येथून प्रचार यात्रेला प्रारंभ केल्यानंतर ड. यशोमती ठाकूर प्रचाराला सुरुवात करतील. महाविकास आघाडीच्या उमेदवार ड. यशोमती ठाकूर या तिवसा विधानसभा मतदार संघातुन निवडणूक लढवीत आहेत. सलग चौथ्यांदा त्या या मतदार संघातून विजयश्री मिळवतील असे वातावरण मतदार संघात आहे. मंगळवारपासून सुरू होणाऱ्या प्रचार यात्रेमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती असणार आहे. वायगाव येथून प्रचाराला प्रारंभ झाल्यानंतर तेथून आष्टी, टाकरखेडा, साउर ,पूर्णानगर या गावातून प्रचारयात्रा निघणार आहे. या दरम्यान ड. यशोमती ठाकूर या नागरिकांशी संवाद



साधून मतदारांना मोठा विजय मिळवून देण्यासाठी आवाहन करणार आहे. ड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा विधानसभा मतदार संघात मोठी विकासकामे केली आहेत. तिवसाच नव्हे तर जिल्ह्यात विकासाची गंगा आणणाऱ्या ड. यशोमती ठाकूरांना मोठया मताधिक्यांनी विजयी करण्यासाठी नागरिकांनी संकल्प केला आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या उमेदवारांच्या प्रचाराला केवळ पंधरा दिवस मिळणार असल्याने कमी वेळेत मतदार संघातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी ड. यशोमती ठाकूर यांचा प्रयत्न असणार आहे. तिवसा विधानसभा मतदार संघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करून मतदार संघाचा कायापालट करणाऱ्या ड. यशोमती ठाकूर यांना मतदार संघातील जनता पुन्हा संधी देणार असल्याचे सध्या चित्र दिसून येत आहे. मंगळवारी श्री क्षेत्र वायगाव या ठिकाणी श्री.सिद्धीविनायकाचे मनोभावे दर्शन करून ड. यशोमती ठाकूर यांच्या प्रचारकार्याला प्रारंभ होणार आहे.या प्रचारयात्रेला परिसरातील तसेच मतदार संघातील नागरिकांनी तसेच महाविकास आघाडीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ड. यशोमती ठाकूर यांनी केले आहे.

# उमेदवारांची होतेय कसरत : जुन्या आठवणींना उजाळा उमेदवार, कार्यकर्ते घालताहेत भावनिक साद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून आस्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची दमछाक होत आहे. जुन्या आठवणींना उजाळा देत मित्र, नातेवाइकांना भावनिक साद घालून आपलेसे करण्याचा प्रयत्नही होत आहे.

जिल्ह्यात आठ विधानसभामतदारसंघांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. विजयाचा गुलाल उधळण्यासाठी विविध पक्षांसह अपक्षांनीही कंबर कसली आहे. सध्या बंडखोरांची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेनंतरच लढतीचे चित्र स्पष्ट होणार असले तरी आतापासूनच अनेक उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली

आहे. सोबतीला कार्यकत्यांचा ताफा घेत गावोगावी भेट देत तेथील मतदारांशी संवाद साधला जात आहे. मतदारांपर्यंतप्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कसे पोहोचता येईल, यासाठी विविध फंडे वापरले जात आहेत. एखाद्या गावात



गेल्यानंतर गावास यापूर्वी कधी भेट दिली होती?लहानपणी मित्रांसोबत कसे खेळत होतो? लहानपणी केलेल्या खोड्या आदींची आठवण आवर्जून काढली जात आहे.

मित्र, नातेवाईक म्हणून नाते जोडले जात असल्याने मतदारही भावनिक होत असून मनमोकळेपणाने उमेदवारांशी संवाद साधत आहेत. भावनिक मुद्याचा उमेदवारास किती फायदा होतो ते निवडणूक निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. सध्या मात्र मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवार विविध फंडे वापरत असल्याचे दिसून येत आहे.

**मतदारांकडून प्रश्नांची सरबत्ती; उमेदवारांची सावध प्रतिक्रिया**

यंदा गावापासून ते देशपातळीवरील मुद्दे चर्चेत असल्याचे पाहावयास मिळत आहेत. प्रचाराची रणधुमाळी अजून सुरू झाली नसली तरी उमेदवार मात्र मतदारांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. एखाद्या गावात गेल्यानंतर मतदारही उमेदवारांवर प्रश्नांची सरबत्ती करीत आहेत. एखाद्या प्रश्नामुळे आपण अडचणीत येणार नाही, याची काळजी उमेदवार घेत आहेत. अवघड प्रश्नांवर सावध प्रतिक्रिया देत मतदार नाराज होणार नाही याची काळजी उमेदवार घेत आहेत.

**युवा मतदार सक्रिय**

उमेदवारी अर्ज भरण्यापासून युवा कार्यकर्ते, मतदार निवडणुकीत सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ कार्यकर्ते, मतदारांनी मात्र सावध पवित्रा घेतल्याने उमेदवारही संभ्रमात दिसून येत आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारखेनंतरच प्रचाराला रंग येण्याची शक्यता आहे.

# मोठ्याऐवजी छोट्या दागिन्यांना पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दिवसेंदिवस सोने-चांदीचे भाव गगनाला भिडू लागल्यान ग्राहकांनीही आता सोने खरेदीकडे काहीशी पाठ फिरविल्याचे दिसून आले. लक्ष्मीपूजनाचा मुहूर्त साधत दरवर्षी सोने, चांदी खरेदीला ग्राहक पसंती देतात. यंदा मात्र सोन्याचे दर ८० हजारांच्या पार झाल्याने गर्दी काहीशी



कमी झाली होती. त्यातही छोटे दागिने खरेदी करण्यासाठी ग्राहकांचा कल असल्याचेही दिसून आले.

अंगठी, चेनला पसंती (बोल्ड करणे)सोन्याचे वाळे, लॉकेट, शिक्के खरेदी करण्यासाठीच ग्राहक दुकानांत आले होते. तसेच काहींनी अंगठी व चेन खरेदीलाही पसंती दिली. परंतु हार, मंगळसूत्र, राणीहार, मोहन माळ, पेशवाई दागिने आदीच्या खरेदीकडे काहीशी पाठ फिरवली होती. सोन्याचे दर वाढल्याने खरेदीवर परिणाम झाल्याची माहिती मिळाली.

**गेल्या वर्षपिक्षा अधिक वाढ**

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सोने आणि चांदी खरेदीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक जण छोटे मोठे का होईना, दागिने, चांदीचे देवीचे शिक्के खरेदी करण्यास पसंती देतात. परंतु यंदा सोन्याचे भाव अधिकच वाढल्याने ग्राहकांनी दागिने खरेदी करण्याला संमिश्र प्रतिसाद दिला.

# दहावीच्या परीक्षा अर्जांसाठी मुदतवाढ कधीपर्यंत भरता येणार अर्ज?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ पुणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार ६ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे.


राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज सरल प्रणालीद्वारे ऑनलाइन पद्धतीने भरायचे आहेत. तर व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणारे विद्यार्थी, आयटीआयचे विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रचलित पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयातर्फे भरायचे आहेत. त्यासाठी ५ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र आता अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला आहे.

# नितीन कदम बडनेरा विधानसभा मतदार संघातील उमेदवारीवर ठाम

## आमचा विजय निश्चित असल्याने विरोधकांचा अपप्रचार- नितीन कदम कदम यांचे अधिकृत चिन्ह ट्रम्प पॅड आयोगाकडून निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

बडनेरा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय तापमान वाढत आहे. अशातच संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा बडनेरा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय अपक्ष उमेदवार नितीन कदम यांच्या नामांकन अर्ज मागे घेण्याची अफवा प्रसारमाध्यमात वाऱ्यासारखी पसरली. परंतू कदम यांनी संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करून या अफवावर विश्वास करू नये, सदर अफवा विरोधकांनी आमचा विजय निश्चित असल्याने पसरवली असल्याचे नितीन कदम म्हणाले. आगामी बडनेरा विधानसभा मतदार संघातील निवडणुकीत कदम यांनी नामांकन अर्ज दाखल करत




अनेकांना हादरा दिला. त्यांची वरचढ ठरत असलेली लोकप्रियता व वाढलेला जनसंपर्क बघता विरोधकांना धडकी भरली असून अनेक आरोप प्रत्यारोपांच्या मालिका बघायला मिळत आहे. आज ४ नोव्हेंबर रोजी नामांकन अर्ज मागे घेण्याची अंतिम तिथी असातांना निवडणुक चिन्हे उमेदवाराला वितरित करण्यात आले आहे. तसेच नितीन कदम यांना ट्रम्प पॅड चिन्ह मिळालं असुन कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण बघायला मिळाले.दरम्यान अश्या प्रकारच्या अफवांना व चुकीच्या महितींना बळी पडू नका असे आवाहन नितीन कदम यांनी आपल्या आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे. यावेळी नितीन कदम यांच्या समवेत संकल्प शेतकरी संघटनेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय चूनकीकर, पर्वेश कदम, ऋषी खोंडे,स्वप्निल मालधुरे,अभिषेक सवाई, नितीन ठाकरे, आकाश पाटील, प्रणव सहारे, ईतर सदस्य व पत्रकार बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# अंबानगरीत ६ रोजी राज गर्जना

## मनसे उमेदवार पप्पू पाटील यांच्या समर्थनार्थ राज ठाकरे यांची जाहीर सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महाराष्ट्राची मुलूखमैदानी तोफ म्हणून प्रसिध्द असलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा ऐतिहासीक अशा अमरावती अंबानगरीत ६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक सायन्सस्कोर मैदान येथे आयोजित करण्यात आली आहे.अमरावती विधानसभा मतदार संघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार पप्पू पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभेमध्ये राज ठाकरे हे राज गर्जना करणार असल्याची माहिती पप्पू उर्फ मंगेश पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. राज ठाकरे यांच्या राजगर्जनेमुळे




अमरावती विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण चित्र पालटून जाईल आणि एक वेगळी राजकीय परिस्थिती दिसेल असा दावा देखील पप्पू पाटील यांनी याप्रसंगी केला.राज ठाकरे हे विदर्भातून आपल्या प्रचार दौर्याचा प्रारंभ ऐतिहासीक अशा अंबानगरी अमरावती मधून करणार असून ६ नोव्हेंबर रोजी दुपारी त्यांचे अमरावतीत आगमन होईल. त्यानंतर अमरावती जिल्ह्यातील प्रमुख मनसे कार्यकर्ते व पदाधिकार्यांसोबत चर्चा करून मग ते सभास्थळी रवाना होतील. सायंकाळी ६ वाजता स्थानिक सायन्सस्कोर मैदान येथे आयोजित जाहीर सभेला ते मार्गदर्शन करणार असून या सभे नंतर ते रवाना होतील, अशी माहिती पप्पू पाटील यांनी दिली. राज ठाकरे यांच्या सभेला समस्त अमरावतीकरांनी तसेच मनसेचे कार्यकर्ते व पदाधिकार्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मनसे उमेदवार पप्पू पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.

**सभा ऐतिहासीक होणार**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांची अमरावतीत होणारी सभा ऐतिहासीक होईल व सर्व रेकॉर्ड मोडीत काढेल, असा दावा पप्पू पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. या सभेला लाखो नागरिक उपस्थित राहणार असून सभेच्या नियोजनासाठी व यशस्वीतेसाठी मनसे कार्यकर्ते व पदाधिकारी कामाला लागल्याचे त्यांनी सांगितले.

# अनवाँटेड कॉल्सचा मारा, सामान्यांना ताण सारा

## कामात व्यत्यय : निवडणुकीमुळे वाढले नेत्यांचे कॉल

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सध्या दिवाळीच्या उत्साहातच विधानसभेच्या निवडणुकीची धामधूम सुरू आहे. उमेदवारी अर्ज भरून झाले असून प्रचारासाठी उमेदवारांसह पक्षांच्या नेत्यांचे कॉल वाढले आहेत. नागरिक मोबाइलवर येणाऱ्या 'अनवाँटेड कॉल्स'ला वैतागले आहेत. चालू कामात व्यत्यय या माध्यमातून येत असून डोकेदुखी वाढली असल्याची ओरड नागरिकांतून होत आहे.

हातातील काम सोडून हे रिकामे कॉल नागरिकांना रिसिव्ह करावे लागत असल्याने लोकांच्या कामात खोळंबा होत आहे. गृहिणीदेखील या सतत येणाऱ्या कॉल्सला वैतागल्या आहेत. त्यामुळे महिलांमध्ये चिडचिडेपणा वाढीस लागला



### दिवसभरातून पाच ते सहा वेळा वाजते रिंग

सोमवारी नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. मात्र अर्ज दाखल केल्याच्या दिवसापासूनच नागरिकांच्या मोबाईलवर दिवसभरातून पाच ते सहा वेळा उमेदवारांच्या प्रचाराची रिंग वाजते. अशावेळी नाहकच मनस्तापही मतदारांना सहन करावा लागत आहे. निवडणूक काळातला हा अनुभव अनेकांना आता घडत आहे.

आहे. दिवाळीच्या हंगामात क्रेडिट कार्ड ऑफर ऑनलाइन क्लासेस, डिश कंपन्या ऑफर, विविध प्रकारचे प्रलोभन, ऑनलाइन साईट्स अशा विविध कंपन्यांचे कॉल्स सातत्याने येत असतात.

दिवसभरात किमान एकाच व्यक्तीला दहा ते पंधरा कॉल सहज येतात. अनोळखी नंबर असल्याने आपला कोणी नातेवाईक किंवा मित्रकिंवा कोणी ओळखीचा असेल किंवा आपलाच विद्यार्थी असेल म्हणून कॉल उचलला जातो; मात्र क्रेडिट कार्डवर ऑफर आहे, तुम्हाला लोन हवे आहे का? डिशवर ही ऑफर, ती ऑफर, तुम्हाला लोन मंजूर झाले आहे. आमच्या ऑनलाइन क्लासेसमध्ये तुम्ही स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊ शकता, अशा विविध प्रकारच्या नको असलेल्या कॉल्सला नागरिक प्रचंड वैतागले आहेत. या अनवाँटेड कॉल्सला वेळेचे बंधन नाही. सकाळ ते रात्रीपर्यंत केंव्हा ही ते फोन येऊन धडकतात त्यामुळेदुपारची वामकुक्षी हरवली आहे. चालू कार्यालयीन कामात, घरकामात, शेतात काम चालू असताना, वाहन चालविताना हे मानसिक त्रास देणारे कॉल सातत्यानेयेत आहे.त्यातच भरीत भर म्हणजे काही उमेदवारांचे ही फोन मलाच मतदान करा हे सांगण्यासाठी वाजत राहतात हे विशेष.

# दिवाळीमुळे पसेंजरसह एक्स्प्रेस गाड्याही प्रवाशांनी फुल्ल

## तिकिटांसाठी वेटिंग : प्रवाशांना सोसावी लागते गैरसोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दिवाळी सणामुळे प्रवाशांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. दिवाळीत गावाकडे येणाऱ्यांची वर्दळ होती. आता परत कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी धावपळ सुरू आहे. यामुळे रेल्वेगाड्या फुल्ल आहेत. दोन महिन्यांपासून काही गाड्यांचे आरक्षण मिळणेही कठीण झाले आहे. साधारण श्रेणीच्या डब्यांत नेहमीच पाय ठेवण्यासाठी जागा मिळत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. नाइलाजास्तव द्वितीय श्रेणीच्या डब्यातून प्रवास करावा लागत



आहे.

प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता एजंट्सनी पैसे कमविण्याचा नवीन फंडा काढला आहे. अधिकचे पैसे घेऊन तिकिटांचे आरक्षण मिळवून दिले जात आहे. हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत आहे.मुंबई- हावडा या रेल्वे मार्गावर बडनेरा वरून नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाश्यां मोठ्या प्रमाणात आहे.अनेक कर्मचारी मासिक पास काढून प्रवास करतात मात्र दिवाळी सणामुळेहाउसफुल्ल असल्याने दररोज प्रवास करणाऱ्यांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

### पास साधारण, प्रवास द्वितीय श्रेणीतून

काही जणांनी टीसींशी मधुर संबंध प्रस्थापित करून आपली सोय करून घेतली आहे. साधारण श्रेणीची मासिक पास असताना नियमांची पायमल्ली करून द्वितीय श्रेणीच्या डब्यातून प्रवास केला जात आहे. रेल्वे प्रशासनाने कारवाईची मोहीम उघडली आहे.

### रेल्वे प्रशासनाचा दुर्लक्षित कारभार

रेल्वे बोर्डाच्या दुर्लक्षितपणामुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या सणामुळे रेल्वेगाड्या प्रवाशांनी हाउसफुल्ल आहेत. एसटी बसेस, तसेच खासगी वाहनांमध्येही गर्दी असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. मात्र, ही गैरसोय टाळण्यासाठी रेल्वे प्रशासन उपाययोजना करताना दिसत नाही. रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षित कारभारामुळे नागरिकांत संतापाचे वातावरण आहे.


# डीजे अन् सिंगरच्या शोधासाठी उमेदवारांची मध्य प्रदेशात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४मोर्शी**

दिवाळी सणाच्या पर्वावर ग्रामीण भागात मंडई उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. याच कालावधीत विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडणार आहे. एकाच वेळी विधानसभा निवडणुका होत असल्याने प्रचाराचे आकर्षण ठरण्यासाठी डीजे अन् सिंगरची मागणी वाढणार असल्याने शेजारी असणाऱ्या मध्य प्रदेशात उमेदवारांच्या कार्यकर्त्यांनी धाव घेण्यास सुरुवात केली आहे. अलीकडच्या दरापेक्षा डीजेचे दर वाढल्याचे काही कार्यकर्त्यांनी सांगितले आहे.

दिवाळी पर्वावर राज्यात विधानसभा निवडणुका होत आहेत. ग्रामीण भागात मंडई उत्सवाचा ज्वर चढणार आहे. भाऊबीज होताच गावागावात मंडईउत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. मंडई उत्सवाचे औचित्य साधून अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

याच कालावधीत विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. प्रचारासाठी डीजेची मागणी वाढली आहे. डीजेच्या आवाजातून उमेदवाराचा प्रचार केला जात असल्याने आधीच डीजे ठरविण्याची घाईगर्दी सुरू झाली आहे.डीजेच्या धूनवर आकर्षक क्लिप तयार करण्यात येत आहे.



शेजारी असणाऱ्या मध्य प्रदेशात आता डीजेसाठी धावपळ केली जात आहे. याची आधीच बुकिंग केली जात आहे.यासोबतच मध्य प्रदेशात अनेक भोजपुरी, छत्तीसगडी गायक आहेत. महिला गायकही मोठ्या प्रमाणावर आहेत. प्रचारात या गायकांना बोलावण्याचाही बेत आखला जात आहे.नवरात्र उत्सवात सिहोरा परिसरात मध्य प्रदेशातील पुरुष आणि महिला गायकांनी हजेरी लावली होती. या गायकांना प्रचारात आमंत्रित करण्यात येणार असल्याने मध्य प्रदेश आणि छत्तीसगडी गायकांना गाठले जात आहे. मराठी आणि हिंदी भाषेतून प्रचाराने सभा गाजणार आहेत.

# प्लास्टिक बंदीचे तीनतेरा ऐन दिवाळीत पर्यावरणाचा ऱ्हास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात प्लास्टिक बंदीच्या धोरणाचे तीनतेरा वाजल्याचे चित्र बघायला मिळाले, मागील काही महिन्यापूर्वीपासून प्रतिबंधित प्लास्टिक वापराप्रकरणी हजारौंचा दंड वसूल केल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत असले तरी प्लास्टिक पिशब्यांचा वापर सर्रास होत आहे. जागोजागी खुलेआम बंदी असलेले प्लास्टिक बघायला मिळाल्याने पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

मागील काही महिन्यांपासून विशेषत: सणासुदीच्या काळात प्लास्टिक बंदीवरील कारवाई बासनात गुंडाळून ठेवल्याने शहरात पर्यावरणाची हानी आणि आरोग्यावर घातक परिणाम होत असल्याची भीती पर्यावरण तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.



यावाचत पालिकेला कधी जाग येणार, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

पालिकेकडून दुकाने, उपाहारगृहे. बाजार, गोदाम, मॉल, कारखाने आदी ठिकाणी प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर कारवाई केली जाते. २०१८ मध्ये राज्य सरकारने एकल वापराच्या प्लास्टिकवर बंदी आणली होती. कोविड कालावधीत ही मोहीम तात्पुरती थांबविण्यात आली. त्यानंतर पालिकेने याप्रकरणी कारवाई करत प्लास्टिक जपत केले मात्र, ठोस कारवाई अभावी बाजारात सर्रास प्लास्टिक पिशव्याचा वापर केला आत आहे. यावर महापालिकेने नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

**घातक परिणाम**

पावसाळ्यात मोठ्या नदी, नाल्यांमाये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचतो. या वस्तू विघटनशील नाहीत है सातत्याने सागूनही त्याच्या वापरावरही नियंत्रण आलेले नाही.

ओला आणि सुका कचरा वेगळा केल्यास फक्यावरील पुनर्वापरा- साठीची प्रक्रिया करणे सोपे जाते. त्यामुळे कचरा वेगळा करण्याचे आवाहन लोकवस्त्वामध्ये केले जाते. मात्र, याकडे सर्वत्र दर्लक्ष होते. त्यातही अनेक लोक सरसकट कोठेही कचरा टाकतात. यातील प्लास्टिक पिशव्यापासून, हलक्या प्लास्टिकचे काळे इथे. शीतपेयाच्या बाटल्या, वेष्हनाचे प्लास्टिक अशा गोष्टी पर्जन्यजल वाहिन्यांच्या मुखाती साचते. पूरस्थितीत हौच बाथ पाण्याचा निचरा होण्यास प्रमुख अडथळा ठरते.त्याचा परिणाम होऊन जैवविविध तेलाही धोका निर्माण होतो. असे पर्यावरणतज्याचे मत आहे.

# प्रशासन निवडणूक कामात व्यस्त : कोणाचेही जाईना लक्ष : शहरात नियमांची 'माळ' तोडून झाली फटाक्यांची जोमात विक्री : सायन्सकोर मैदानाची दयनीय स्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

पाच दिवसांपूर्वी हैदराबाद रामकोट येथे फटाक्यांच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेचा धक्कादायक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असताना प्रत्येकजण फटाक्यांचे नाव काढले तरी सुरक्षिततेचा विचार करीत आहे. परंतु अमरावती सह जिल्ह्यातील बाजारपेठेत सध्या नियमांची 'माळ' तोडून फटाके विक्री जोरात सुरु आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने कुठल्याच उपाययोजना नाहीत, तर दुसरीकडे निवडणूक कामात गुंतलेल्या प्रशासनाचेही या कारभाराकडे लक्ष जात नसल्याने नागरिकांतून नाराजीचा सूर उमटत आहे.

दीपावली निमित्त शहरातील सायन्सकोर मैदान सह अन्य ठिकाणी फटाके विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत. फटाके विक्रेत्यांना प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनेही दुकान व परिसरात आवस्यक त्या उपाययोजना करणेही बंधनकारक आहे. परंतु, प्रारंभी फटाके विक्रेत्यांनी प्रशासनाचा परवाना हाती पडण्याच्या दोन दिवसाआधीच दुकाने थाटून फटाके विक्रीलाही सुरुवात केली होती.

विशेष म्हणजे, हा प्रकार प्रशासकीय यंत्रणेच्या लक्षात



आल्यानंतरही त्याकडेकानाडोळाकरीत फटाके विक्रेत्यांच्या हाती परवाना देण्याकरिता संबंधित कर्मचाऱ्यांनी सुटीच्या दिवशीही धावपळ केली. परंतु, सध्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या ठिकाणी उपाययोजना करण्यात - आलेल्या नसून, नियम पायदळी - तुडवित फटाके विक्री होत आहे.

### निवडणूक प्रक्रिया सुरू

सध्या विधानसभा असल्याने प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी या कामी गुंतले आहेत. त्यामुळे नियम डावलणाऱ्याऱ्यांचे चांगलेच फावत आहे. असे असले तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने बाजारपेठेवरील फटाके विक्रीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा, सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### सायन्सकोर मैदानाची दयनीय स्थिती

जिल्हापरिषदेच्या अखतारीत येत असलेल्या सायन्सकोर मैदानात वर्षभरकोणते न कोणते कार्यक्रम,प्रदर्शनी सुरू असतात या माध्यमातून जिल्हा परिषदेला लाखो रुपयांचे उत्पन्न मिळते मात्र जिल्हा परिषद या मैदानाच्या साफ सफाई कडे कोणतेही लक्ष देत नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल.या ठिकाणी दररोज शेकडो नागरिक सकाळी मॉर्निंग वॉक साठी येतात मात्र त्यांना या घाणीचा कचऱ्याचा सामना करावा लागतो.